सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१*

**कलम-४(१)(ख)(एक) — प्रशिक्षणशाखेची रचना, कार्य व कर्तव्य यांचा तपशील**

| अ. क्र. | तपशील | प्रशिक्षण शाखेची रचना, कार्य व कर्तव्य |
|---|---|---|
| 1 | शाखेचे नांव | प्रशिक्षणशाखा |
| 2 | संपूर्ण पत्ता | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,<br>महाराष्ट्र राज्य, 28, गणेशवाडी बाग, पुणे-411002 |
| 3 | दूरध्वनी क्रमांक | 020/26363483 |
| 4 | ई-मेल | trg.trti-mh@nic.in |
| 5 | कार्यालय प्रमुख | आयुक्त |
| 6 | प्रशासकीय विभाग | आदिवासी विकास विभाग |
| 7 | कार्यक्षेत्र | महाराष्ट्र राज्य |
| 8 | शाखेचे ध्येय व धोरण | महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणानुसार विभागातील सर्व संवर्गासाठी प्रशासकीय प्रशिक्षण देणे. |
| 9 | शाखेचे कामाचे स्वरूप | १. आदिवासी विकास विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी-कर्मचारी / शिक्षक, शिक्षकेतर यांचे सक्षमीकरण आणि अद्यायावतिकरण करण्याकरिता राज्य प्रशिक्षण धोरणानुसार पायाभूत, उजळणी, पदोन्नतीनंतरचे तसेच विविध कायदे विषयक प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करणे.<br>२. संवर्गनिहाय व विभागाने केलेल्या मागणीनुसार प्रशिक्षण कार्यक्रमांचा वार्षिक आराखडा तयार करणे व त्यास प्रशासकीय मान्यता घेणे.<br>३. प्रशिक्षण कार्यक्रमांची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थीना त्यांच्या गरजांनुरूप प्रशिक्षण मिळणेकरिता TNA (Training Need Analysis) करणे व त्याची वैधता (TNA Validation) तपासणे.,<br>४. केलेल्या गरजांच्या अभ्यासानुरूप संवर्ग निहाय विविध विषयांची सूची करणे व त्यासाठी तज्ञ साधन व्यक्तीची सूची तयार करणे.,<br>५. गरजांच्या अभ्यासानुरूप विविध प्रशिक्षणासाठी संवर्गनिहाय Training Modules तयार करणे.<br>६. संवर्गनिहाय प्रशिक्षणांसाठी लागणाऱ्या प्रशिक्षण साहित्याची निर्मिती करणे,<br>७. आराखड्यानुसार प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याकरिता लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता घेणे.<br>८. प्रशिक्षण कार्यक्रमांच्या सुलभ आयोजनाच्या दृष्टीने आयुक्तालय, नाशिक, सर्व अपर आयुक्त कार्यालय तसेच प्रकल्प कार्यालय यांच्याशी संपर्क करून समन्वय साधणे. |

| अ. क्र. | तपशील | प्रशिक्षण शाखेची रचना, कार्य व कर्तव्य |
|---|---|---|
| | | ९. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता विषय निहाय, तज्ञ व्याख्यात्यांच्या वेळा घेऊन त्यानुसार वेळापत्रक तयार करणे. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकाच्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थीची निवास आणि भोजनयांची व्यवस्था करणे.<br>१०. प्रशिक्षणा दरम्यान वेळेचे, व्याख्यात्यांचे काटेकोर नियोजन, गृहकार्य. assignments, रजिस्ट्रेशन, उपस्थिती, शिस्त याबाबींची काळजी घेणे.<br>११. प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणासंबंधी सर्व व्याख्यात्यांचे मानधन, निवास आणि भोजन तसेच इतर व्यवस्थांचा खर्च अदाकरण्यासंबंधी कार्यवाही करणे. त्यादृष्टीने प्रत्येक प्रशिक्षण कार्यक्रमाची नस्ती सर्व तपशिलांसह जतन करणे.<br>१२. सचिव पातळीवरील बैठका, कल्याण समिती, जनजाती सल्लागार समिती, नियामक मंडळ, कार्यकारी मंडळ यांच्या बैठकांसाठीची माहिती तयार करणे.<br>१३. प्रशासकीय अहवाल, वार्षिक अहवाल, माहिती अधिकार संबंधीचा मासिक, तिमाही व वार्षिक अहवाल तसेच इतर अनुशांगिग विषयांचे अहवाल तयार करणे.<br>१४. माहिती अधिकार व अपील अर्जाचा निपटारा करणे, त्यासंबंधीचे विविध अभिलेखे जतन करणे.<br>१५. तारांकित प्रश्न, लक्षवेधी प्रश्न, विधानसभा प्रश्न, लोकसभा प्रश्न या संबंधीची कार्यवाही करणे.<br>१६. प्रशिक्षणासंबंधी सर्व आवश्यक विहित नोंदवह्या, अभिलेखे आणि नस्ती यांचे जतन करणे |
| **१०** | **कार्यालयाची वेळ** | सकाळी 9.45 वा. ते सायंकाळी 6.15 वा. |
| **११** | **साप्ताहिक सुट्टी** | महिन्याचा प्रत्येक शनिवार व रविवार |

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम- 4 (1) (ख) (दोन)- प्रशिक्षण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये**


| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | नेमणूक | अधिकार कक्षा व कर्तव्य |
|---|---|---|---|---|
| 1 | अधिव्याख्याता | ०२ | नियमित | (1) प्रशिक्षण कक्षाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कामकाजाचे नियंत्रण ठेवणे.<br>(2) सर्व संवर्गासाठीचे TNA. Modules, प्रशिक्षण कार्यक्रम आराखडा, वेळापत्रक इ. यांचे नियोजन करणे.<br>(3) वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे, आर्थिक नियमन आणि उपलब्धता याची जबाबदारी पार पडणे.<br>(4) नाविन्यपूर्ण योजनांचे मंजुरी साठीचे प्रस्ताव शासनास सादर करणे,<br>(5) प्रशिक्षण कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी आणि येणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे, तसेचसुरु असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यक्रमावर नियंत्रण व समन्वय ठेवून येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. |
| २ | सांख्यिकी सहाय्यक (व) | ०१ | नियमित | 1) विविध प्रशिक्षण कार्यक्रम तसेच प्रस्ताव यांचेसाठी टिपणी लेखन करून नस्ती सादर करणे.<br>2) विविध विषयांसंबंधीचा शासन स्तरावरील पत्र व्यवहार आढावा बैठका<br>3) सचिव पातळीवरील बैठका, कल्याण समिती, जनजाती सल्लागार समिती, नियामक मंडळ, कार्यकारी मंडळ यांच्या बैठकांसाठीची माहिती तयार करणे.<br>4) प्रशासकीय अहवाल, वार्षिक अहवाल माहिती अधिकार संबंधीचा मासिक, तिमाही व वार्षिक अहवाल तसेच इतर अनुशांगिग विषयाचे अहवाल तयार करणे.<br>5) माहिती अधिकार व अपील अर्जाचा निपटारा करणे, त्यासंबंधीचे विविध अभिलेखे जतन करणे,<br>6) तारांकित प्रश्न, लक्षवेधी प्रश्न. विधानसभा प्रश्न, लोकसभा प्रश्न यासंबंधीची कार्यवाही करणे,<br>7) प्रशिक्षणासंबंधी सर्व आवश्यक विहित नोंदवह्या अभिलेखे आणि नस्ती यांचे जतन करणे. |
| ३ | अन्वेषक (व) | ०२ | नियमित | १. स्पर्धा परीक्षा विषयक प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करणे.<br>२. राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे, त्यासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करून घेणे, तसेच तरतुदीचे वाटप करणे व लेखा ठेवणे.<br>३. प्रशिक्षण विषयक सांख्यिकी माहिती संकलित करणे.<br>४. शासन स्तरावरील व इतर अनुषंगिक विषयांसंबंधीचा पत्रव्यवहार पाहणे. |

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम — ४ (१) (ख) (तीन) — निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यास येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली**



सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

***आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001***

**कलम 4 (1) (ख) (चार) स्वतःची कामे पार पाडण्यासाठी त्यांच्याकडून ठरविण्यात आलेली मानके**

प्रशिक्षण शाखेशी संबंधित कामकाज हे राज्य प्रशिक्षण धोरण, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक, शासन पत्र, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अन्वये करण्यात येते.

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

***आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001***

कलम 4(1) (ख) (पाच) त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टीआरएन-09/प्र.क्र. 39/09/12-अ, दि. 23 सप्टेंबर 2011
२. आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांकः प्रशिक्षण 2012/ प्र.क्र 158 (भाग-2)/का-17 दिनांक 15 जुलै, 2014
३. आदिवासी विकास विभागाचे शुद्धीपत्रक क्रमांक प्रशिक्षण-2019/प्र.क्र. 21/का -09 दिनांक 25 मार्च 2019
४. आदिवासी विकास विभागाचे शुद्धीपत्रक क्रमांक प्रशिक्षण 2011/ प्र.क्र. 21/का. -09 दिनांक 30 ऑगस्ट 2019
५. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्र3 का 551/1085 जी ओ आय दिनांक 291985 11
६. संबंधित शाखेच्या अंतर्गत सूचना व कार्यपद्धती सदर्भातील आयुक्त, आ.स.प्र.सं पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना
७. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005.

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

***आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001***

**कलम 4(1) (ख) (सहा)- त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण.**

---

१. कार्यासन टपाल नोंदवही.
२. स्थायी आदेश नस्ती.
३. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 प्राप्त अर्ज व प्रथम अपील अर्ज नस्ती.
४. कार्यासनातील विविध विषयाबाबत प्राधान्यक्रमानुसार नस्त्या व नोंदवह्या

---

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

***आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001***

**कलम 4(1) (ख) (सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तीत्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील.**

---

संस्थेचे धोरणं तयार करण्याच्या व त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात नियामक मंडळ व कार्यकारी मंडळ यामध्ये अशासकीय सदस्यांचा समावेश आहे तसेच लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी सदर शाखेने त्यांनासंपर्क साधण्याकरिता संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळावर या शाखेचा ईमेल व दूरध्वनी क्रमांक व पत्ता उपलब्ध करून दिलेला आहे

---

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

***आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001***

**कलम 4(1) (ख) (आठ) आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.**

---

सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी नियामक मंडळ, कार्यकारी मंडळ ही यंत्रणा कार्यरत आहे यातील सदस्यांची माहिती संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे सदर मंडळांच्या बैठकी इतर लोकांसाठी खुल्या नाहीत व कार्यवृत्तेजनतेला पहावयास खुलेनाहीत.

**कलम 4(1) (ख) (नक) - आपल्या अधिका-यांची आणि कर्मचा-यांची निर्देशिका.**

---

**प्रशिक्षण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांची निर्देशिका**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व पदनाम | दुरध्वनी संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| **प्रशिक्षण कक्ष** | | |
| १. | श्री. विजय गुंड, अधिव्याख्याता | ०२० २६३६२७४३ |
| २. | श्रीमती. माधुरी शाहाणे, अधिव्याख्याता | |
| ३. | श्री. सुरेश कांबळे, सांख्यिकी सहाय्यक (व) | |
| ४. | श्रीमती. प्रतिभा मालसे, अन्वेषक (व) | |
| ५. | श्री. प्रशांत परमार अन्वेषक (व) | |

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4 (1) (ख) (दहा) आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दती.**

**प्रशिक्षण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे मासिक वेतन**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व पदनाम | वर्ग | मुळ वेतन |
|---|---|---|---|
| १ | श्री. विजय गुंड, अधिव्याख्याता | वर्ग-२ | रु.६७,१००/- |
| २ | श्रीमती. माधुरी शाहाणे, अधिव्याख्याता | वर्ग-२ | रु.६५,९००/- |
| ३ | श्री. सुरेश कांबळे, सांख्यिकी सहाय्यक (व) | वर्ग-३ | रु.६०,४००/- |
| ४ | श्रीमती. प्रतिभा मालसे, अन्वेषक (व) | वर्ग-३ | रु.३३,३००/- |
| ५ | श्री. प्रशांत परमार (व) | वर्ग-३ | रु.३३,३००/- |

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4(1) (ख) (अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रमकांचा अहवाल.**

## प्रशिक्षण विभागातर्फे राबविण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम

**अ) सेवांतर्गत प्रशिक्षण :-**

सन २०११ पासून 'सर्वासाठी प्रशिक्षण' हे धोरण या कार्यालयामार्फत राबविण्यात येत असून आदिवासी विकास विभागाच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन व कार्यवाही या संस्थेच्या प्रशिक्षण विभागाकडून करण्यात येते. या प्रशिक्षणांद्वारे प्रशिक्षणार्थीना त्यांच्या कामकाजासंबंधी आवश्यक ज्ञान, माहिती, विविध कायदे. शासकीय नियम-नियमावली, कौशल्य वृद्धी आणि त्यांचे कर्तव्य व जवाबदाऱ्या यांची जाणीव करून देणे व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करिता त्यांना अधिक कार्यक्षम बनविणे हि उद्दिष्टे ठेवून सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. यासोबतच सकारात्मक दृष्टीकोन आणि मूल्य शिक्षण या विषयांचा देखील प्रशिक्षणात समावेश केला जातो. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीकडे लक्ष देऊन त्याचा सकारात्मक परिणाम कार्यालयाच्या कामकाजावर कसा होईल याचे नियोजनात्मक प्रशिक्षण दिले जाते.

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4(1) (ख) (बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका-यांचा तपशील.**

१. प्रशिक्षण शाखेमार्फत सेवांतर्गत, सेवापूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. राज्य प्रशिक्षण धोरणानुसार सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी वार्षिक आराखड्यानुसार विभागातील सर्व संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडून प्रशिक्षणार्थींची निवड केली जाते व निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थींची निवास व भोजन व्यवस्था, व्याख्यात्यांचे मानधन तसेच प्रशिक्षण अनुषंगिक इतर बाबींवर खर्च केला जातो.

- **योजना व प्रशिक्षणार्थींचा तपशिल :**

| Year | In-service | | |
|---|---|---|---|
| | No. of Trainings conducted | No. of participants | Expenditure (In Lakh) |
| 2022-2023 | 33 | 1210 | 223 |
| 2023-2024 | 50 | 2268 | 265 |
| 2024-2025 | 37 | 1903 | 230 |

सन २०२५

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4 (1) (ख) (तेरा) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.**

*निरंक/लागू नाही*

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4 (1) (ख) (चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील.**

प्रशिक्षण शाखा व त्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती https://trti.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर विभाग या सदरामध्ये प्रशिक्षण या शिर्षकांतर्गत नमूद करण्यात आलेली आहे.

**प्रशिक्षण शाखा**

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4 (1) (ख) (पंधरा) - माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.**

प्रशिक्षण शाखेसंबंधीची माहिती नागरिकांसाठी संस्थेच्या अधिकृत संकेत स्थळावर मिळण्याचीसुविधा आहे.

## प्रशिक्षण शाखा

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम - 4(1) (ख) (सोळा) जन माहिती अधिका-यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील.**

---

प्रशिक्षण शाखेतील सहाय्यक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे

| अ.क्र. | शाखेचे नांव | सहाय्यक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षण शाखा | श्री. सुरेश कांबळे<br>सांख्यिकी सहाय्यक (व) | श्री. विजय गुंड<br>अधिव्याख्याता | श्री. नवेंदू फिरके सर<br>उपसंचालक |

---

## प्रशिक्षण शाखा

*आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001*

**कलम 4 (1) (ख) (सतरा) - विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती, प्रसिध्द करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील.**

विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती प्रसिध्द करण्यात येईल आणि त्यानंतर ती माहिती प्रशिक्षण शाखेकडून दरवर्षी अद्ययावत करण्यात येईल.

**(विजय गुंड)**
**अधिव्याख्याता**
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे